२८०
काव्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४२३.

२८०

टोकेकरकृत.

# सुबोध काव्य माला.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

ालय क्रमांक

लेखक मा. वि. टोके

पुस्तकाचें नांव सुबोध

सन

# जी. बी. नाईक कंप०

## ांगठ्या, पुतळ्या, कडीं, लेख०

७५,००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्या० रो दाखले मिळ० व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे. रक्त खराब असल्यामुळें होणारे **सर्व रोग** ह्या लहानशा अतिस्वस्त ब्याटरी वापरल्या पासून **बरे होतात,** हें **जगत्प्रसिद्ध** आहे. करितां अशी ही उत्तम, गुणकारी सर्व रोग शमविणारी, अंगावर सुशोभित दिसणारी, औषधी खटपट चुकविणारी, चमत्कारिक **भूषणावह** व **आरोग्यदायक** वस्तूंचा संग्रह करून अनुभव पहा व मित्रमंडळींत फैलाव करा, ही विनंती.

## विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पुतळीस किं रु. १। | धा. कड्यास किं. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं रु. ३ | पुतळीस किं. रु. २ | धा. लेखणीस किं. १। |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. १। |

खोटा माल घेऊन फसूं नका. आमचे प्रत्येक वस्तूवर G.B.N. मार्क पाहून घेत जा. एकदम बारा नग घेणारांस एक जास्त मिळेल. बंगी करणावळ माफ. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं. अनेक रोगांवर गुण आल्याचें शेंकडों सर्टिफिकिटांचें पुस्तक मालाबरोबर पाठवूं, किंवा अर्धा आणा पाठवून मागवा, ह्मणजे पाठवूं. बाहेर गांवीं एजंट पाहिजेत.

**जी. बी. नाईक आणि कंपनी,** जुन्या दावणी समोर, भायखळा, **मुंबई.** व बुधवारपेठ **पुणें.**

श्रीदत्तात्रेय प्रसन्न.

# सुबोधकाव्यमाला.

## भाग १ ला.

हें पुस्तक

मार्तंड विश्वनाथ टोकेकर, स्टोअरकीपर

विरार म्यानुफॅक्चरिंग कंपनी बडनेर,

प्रांत वऱ्हाड.

यांनीं रचिलें

तें

दत्तात्रय गोविंद सडेकर

यांनीं

बेळगांवसमाचार छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें

सन १८९२ शके १८१४

किंमत ३ आणे.

रा. काव्य
१३४

# प्रस्तावना.

स्वदेश बांधवहो! निरनिराळे विषयांवर कविता रचून त्यां पासून होणारे बरे वाईट परिणाम यांचें यथाशक्ती दिद्दर्शन केले आहे. तरी, सुधारक-ते खरी सुधारणा करूं इछिणारे हो कुधारकांना नव्हें. विद्यार्थी व त्यांचे चालक व पालक यांस व स्वदेश भगिनी यांस अंशतः तरी सन्मार्ग दाखविण्यास वाटाडे होतील अशी आशा धरून सज्जन सेवेस ही 'सद्बोधदाइ काव्यमालिका' सादर केली आहे. तरी ते हिला निरंतर स्वकंठांत धारण करून स्वतःचे देहासच नाहीं तर, ह्या आर्य जननीस भूषित करितील अशी आशा आहे! मित्रहो! यांत गण, मात्रा, यमक आदि करून बऱ्याच चुका असतील तरी 'हंसक्षीर' या न्यायानें गुणांचेंच तेवढें गृहण करून ग्रंथ कर्त्याला निरंतर अशीच स्वदेश बंधू भगिनीची सेवा करण्यास उत्तेजन द्याल अशी आशा आहे.

हें पुस्तक छापवून काढण्याचे व इतर कामीं माझे परम प्रिय मित्र रा. रा. दत्तात्रय गोविंद सडेकर, यांनी बरेच श्रम घेतले या बद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे.

मा. दि. टोकेकर.

काव्यमालाकार.

# अनुक्रमणिका.


१ मात्रोपकार. .... .... .... .... १
२ गाईचा हंबरडा. .... .... .... ३
३ गर्वोक्ती निषेध. .... .... .... ५
४ मत्सर. .... .... .... .... ७
५ द्रव्यलोभ. .... .... .... .... १०
६ मद्यपाननिषेध. .... .... .... १३
७ वेश्यागमन निषेध. .... .... .... १५
८ पतिव्रताधर्म. .... .... .... १७
९ एका भाग्यवानाचा स्त्री विरह. .... १९
१० उष्णकाळ. .... .... .... २१
११ पितृसेवा. .... .... .... .... २३
१२ ग्रंथकर्त्याची ईश्वरास प्रार्थना. ........ २८

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ७ | सींचनें. | सिचनें. |
| १ | १० | सारिलें. | सारिले. |
| ३ | ७ | सींचनें. | सिचनें. |
| ३ | १२ | पुढारीतें. | पुढारीते. |
| ४ | २० | आह्मां. | अह्मां. |
| ५ | १२ | यांचा. | याचा. |
| ५ | १५ | वाटूं. | पाळूं. |
| ६ | ३ | याला. | पाला. |
| ६ | ९ | मोद्दुनिवेशें पारितरात | मोड्डूनिवेगें परितगत. |
| ७ | ११ | निर्गर्वी. | निगर्वी. |
| ७ | १३ | शूलपाणी. | शुलपाणी. |
| ८ | १३ | जलाधि. | जलधि. |
| १० | १२ | विपत्तिंत महा. | निपत्ति तम हा. |
| १० | १६ | देवचि द्रव्य. | द्रव्यचि देव. |
| १० | १९ | इतुक्याहीं. | इतूक्यांहीं. |
| ११ | १ | अन्यायशामि. | अन्याय गामि. |
| ११ | २४ | अधर्मीतें. | अधर्मीते. |
| १२ | २१ | गुरकटी. | गुरफटी. |
| १२ | २२ | नमुनि. | नमूनि. |
| १३ | १५ | वरी ती. | वरी ती. |
| १३ | २२ | वर्णावीं. | वर्णावें. |
| १४ | १ | जळो. | जळें. |
| १४ | ११ | तुह्मी. | तुह्मां. |
| १६ | १४ | झोप.ती. | झोंपती. |
| १९ | १७ | चिंत्ता. | चिंता |

# ईशस्तवन.

## वसंत तिलका.

दत्तात्रा ! सुरपते ! विनती तुलाही ॥
द्यावी मला मति सुकाव्य रचावयाही ॥
न्यावी हरोनि मम कुधि तुवां तमाला ॥
द्यावा प्रसाद सुमते ! प्रिय बालकाला ॥ १ ॥
जे जे तरंग उठती मम मानसांत ॥
ते ते करी सफल तूं दयितें जनांत ॥
लागो सुजाण मनुजां रुचि वाचनाची ॥
सेवा गमो मधुरकीं जनिं मा.वि.टो.ची ॥२॥

## उपजाती.

ही काव्यमाला रचुनी पित्यातें ॥
आर्पीयली पार्वतिनाथ यातें ॥
सूधारणा होइल जाणुनी हें ॥
आरंभिलें दुस्तर कार्य पाहे ॥ ३ ॥

मा. वि. टो.

मराठी ... ग्रहालय
अ. नं. ...
आणि सन १८५
कोल्ह
२५०

# मात्रोपकार.

श्लोक शा० वि०

वाहूनी नवमास भार उदरीं कष्टां जिणें सो
शिलें ॥ प्रेमें न्हाणुनि माखुनी रिझविलें दु
ग्धि स्तनीं पाजिलें ॥ हर्षे खेळवि बोबडेहि
वच ते सांगे तुह्मां प्रीतिनें ॥ मानूनी उपका
र, तीस सुखवा सौख्याब्धिच्या सींचनें॥१॥
होतां दुःख तुह्मां अनेक वगदें देऊनि संर
क्षिलें ॥ घेऊनी कडि, खांदि, मांडि वरि हो
लाडा बहू सारिलें ॥ कुर्वाळूनि करें जिहीं र
मविलें घेऊनि हीं चुंबनें ॥ मानूनी उप०॥२॥
चर्माच्या जरि पादुका. करुनि हो पायीं ति
च्या लेइल्या ॥ नाहीं हो फिटणार भार स
तिचे तीर्थी बहू फीरल्या ॥ जनित्याचे उपका
र हो फिटतिसे शास्त्र वदे काशिनें ॥ मानूनी
उपकार तीस सुखवा सौख्याब्धि० ॥ ३ ॥
दुखवी जो कटु भाषणें करुनियां मातेप्रती तेध
वां ॥ आज्ञा भंग करी सदां बडबडी लावी
करायाऽजवा ॥ अंतीं मोक्ष नसे तया, नरक
हो जाणा तुह्मीं भोगणें ॥ मानूनी उप०॥४॥
मित्राची, गुरुची, तशी नृपतिची पत्नी हि

माते परी ॥ पत्नीची जननी तशीच अपुली ह्या पांच माता परी ॥ जाचावें नच ईतुक्यां सहि असें संतांदिही बोलणें ॥ मानूनी०॥५॥
पाहा राहिलि एक स्त्रीहि अजुनी माते परी जी असे ॥ मानावी परस्त्रीहि मातृसमहो शास्त्रींच ऐसें वसे ॥ 'मोरोपंत' कवीहि आर्यें ह्मणती ऐसेंच हो वागणें ॥ मानूनी० ॥ ६ ॥
व्हावें सावध तुह्मि आजि ह्मणुनी केली असे सूचना ॥ चित्तीं पूर्ण ठसेल बोध तुमच्या झाली मला कल्पना ॥ याचे हो मनना करूनि चुकवा क्लेशांदिहि भोगणें ॥ मानूनी० ॥ ७ ॥
केले बाळपणींच कष्ट सतिनें वर्णू किती येथ हो ॥ वर्णीतां न कळे कितीक मजला लागेल तो काळहो ॥ होऊनी इतुकेंहि तुह्मि मग हो त्रासाल या वृद्धिनें ॥ मानूनी उप० ॥ ८ ॥
व्हावी कीर्ति जनीं असा जरि तुह्मीं पाळाल हेतू मनीं ॥ आयासाविण पूर्ण होइल पहा इच्छा त्वरें साधुनी ॥ आभारीं जननी स्मराल तरि हो गाजाल सू कीर्तिनें॥मानूनी०॥९॥
अंतीं मोक्षपदा तुह्मीं सकलही पावालहो निश्चयें ॥ त्या योगें जिवमुक्त जन्ममरणा पासूनि निःसंशयें ॥ अंतींच्या यमयातना चुकविण्या प्रार्थी इशा सूमनें ॥ मानूनी० ॥१०॥
केला जो इतुका सुबोध रस त्या चाखूनि घ्या माधुरी ॥ कांहीं तथ्य नसे असें समजुनी झा

कूं नकाहो दुरी ॥ पदरीं हें पडुनी पवित्र जहालें ऐसें तुह्मीं मानणें ॥ मानूनी० ॥११॥ कत्यांचे श्रम भाग प्रीय जनहो वायां नका घालवूं ॥ कीर्तीचा उगवेल जो दिनमणी मिथ्या नका मालवूं ॥ वारंवार सुबोधिं ही वदतसे मार्तंड हें मागणें ॥ मानूनी उपकार तीस सुखवा सौख्याब्धिच्या सींचनें ॥१२॥

---

## गाईचा हंबरडा.

सुधारकांदि बांधवहो !

### दिंडी.

जगा माजीं सत्कृत्य करायाला ॥ निपुण आहां आज या मितीला ॥ धरुनि धैर्या होऊनि पुढारीतें ॥ बंद करवा गो वधा निर्मुलातें ॥ १ ॥ कसा ऐकवतो आमुचा हुंबराहो ॥ कसें निर्दय ना पाझरें सुहृदतेंहो ॥ मिळुनि अवघे आक्रांत करा ऐसा ॥ करुनि गो रक्षण सभा जगीं खासा ॥ २ ॥

### वसंततिलका.

केल्या जरी विबुधहो बहुतां सभांतें ॥ घेतां जरी श्रम अती मम रक्षणातें ॥ निर्मूळ नाहिं तरिहो जहालें वधाचें ॥ भालकुणीं उदरिं मारिति लालसाचे ॥ ३ ॥

## आर्या.

गर्वें मूढ बनोनी करिती जन कांहिं स्वार्थ साधा या ॥ यत्न परी न फळे तो होतो उलटाचि त्यांसि त्रासाया ॥४॥ ह्मणती एक कशाला घ्याव्या 'गाई' खर्चूनि आपुला दाम ॥ राहिल तो जरि जवळीं होइल तें आपुलें बहुकाम ॥ ५ ॥ दैवें कांहीं मनुजां मिळतां वर्चस्व या जगा माजीं ॥ दुरूपयोग त्याचा करिती तद्दास ही महापाजी ॥ ६ ॥

## साकी.

आर्य जननिच्या उदरीं जन्मुनी करिति न ते उपकार ॥ परंतु दात्या आड येउनी करिती बहु अपकार ॥ दासांकित रहाती ॥ पापा बहु जोडीती ॥ ७ ॥

## शार्दूल विक्रीडित.

आहे दीन बहू मुकी गरिब मी नाहीं मला आसरा ॥
तुह्मांवीण कुणी पहा सुजनहो बांधामनीं कासरा ॥
त्यागूनी धनलोभ दुष्ट कसयां लावा धुळी खावया ॥
राहा तत्पर नित्य दीन आमुचा कैवार तो घ्यावया ।८।

## हरिणी वृत्त.

करित विनती देशीबंधो बहू विधहो तुम्हां ॥
रडुनि रडुनी शक्ती गेली नसे असरा आम्हां ॥
हिंदूवीणें यवनादी हे छळा करिती पहा ॥
निरपराध्या आश्रा द्या द्या नका बधुं अंतहा ॥९॥

## शालिनी.

जाईल ती देवि भुमी लयाला ॥ पाडील शोकीं सक

काव्य
२६०

ला जगाला ॥ ध्यानीं मनीं राखुनि रक्षणास ॥
सोडूं नका पुण्य जोडावयास ॥ १० ॥

पद.

अजी शेवटची, विनती ही या गाईची ॥ ध्रृ० ॥
गो रक्षण त्यां वंद्य सभांची ॥ होवो बहु जगीं वृद्धी
साची ॥ लय पावोती दुष्कृत्यांची, ॥ राशि करिति
त्यां दुष्ट जनांची ॥ वि० ॥ ११ ॥

---

## गर्वोक्ति निषेध.

शालिनी.

गर्वा मुळें मान रहात नाहीं ॥ हानी कुचेष्टा करि
ती सदांही ॥ तिरस्कार येतो सर्वांस त्यांचा ॥
कैसें कसीतां गळिं फांस यांचा ॥ १ ॥

दिंडी.

जरी जहाला विद्वान तुह्मीं थोर ॥ मेळविलि ही
संपत्ति अनीवार ॥ नका वाटूं हो मानसीं गर्व
ताठा ॥ होय जेणें सर्वदां बहू तोटा ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित.

ज्या मूढें बहु गर्व वाहुनि मनीं मातापिता त्यागिले ॥
बंधू, आप्त, जनां तसेंच गरिबां सुज्ञांस ही गांजिलें ॥
गर्वानें इश नाम ही न कधिंहो नाहींच उच्चारिलें ॥
त्याचें या नरजन्मि भद्र ह्मणुनी नाहीं मुळीं जाहलें॥३॥

## दिंडी.

देव दैत्यांचा गर्व नाहिं गेला ॥ शेवटासी मानवां काय याला ॥ नका जनहो भरिस पडूं व्यर्थ ॥ यांत अर्थाचि वा नसे परमार्थ ॥ ४ ॥

## स्रग्धरा.

संपत्ती बहुत आहे परि मनिं न वसे गर्व किंतू जयाचे ॥ अठरा विश्वें दरिद्राग्रृहिं वसत असे दुष्ट ताठाहि त्याचे ॥ त्यांतें दृष्टांत हाची सुजनहि वदति त्यां उंच ही वृक्ष जाती ॥ जाती मोडुनि वेशें परितरात त्रण जें जाणतें वायु दिप्ती ॥ ५ ॥

## आर्या.

पर्वत प्रायाचि समजा फुगला जो गर्व लेश बिंदूनें ॥ नच राही थेंबोदक होतो सिंचित जई सुमेघानें ॥६॥

## शार्दूल विक्रीडित.

लंकाधीप बलाढ्य जो दशमुखी गर्वोक्ति ज्या देवता ॥ चौर्यत्वें खल गर्वि अंध बनुनी आणि सती श्रीसिता ॥ वृद्धांहीं उपदेशिलें परि न जो सोडी सिता गर्वंवा ॥ तो होई हतवीर्य मर्कटिं कसा मारी तया राम बा ॥ ७ ॥

## साकी.

सरोवराची उपमा साजे नम्र जनांतें समजा ॥ नगांवरील तें मेघोदकही सांचत तेथें मनुजा ॥ यांतचि तुह्मि समजा ॥ झडकरी सावध व्हा जा ॥८॥

## आर्या.

होइल तितुकें करुनी त्यागा हा दर्प,गर्व तुह्मि सर्व॥

थाहिंच होउनी कीर्ति तुह्मां तो राखिल कीं सुरशर्व ९

### दिंडी.

काय कथणें तें अधिक तुह्मां आतां ॥ नका अवमानूं फेकुं ह्या कवीता ॥ आदि अंताच्या करुनि विचारासी ॥ करा सर्वही हो ऐक्य स्वदेशासी ॥१०॥

### वसंततिलका.

जाईल ती उणिव आपुलि हो खचीत॥ होईलहो जरि तुह्मांमधिं एक चित्त॥कांहीं नको कुणि अह्मां मग साह्य होणें॥सोडूं अह्मीं खचितहो परक्यासि भेणें११

### साकी.

निर्गर्वी तो पूरुससमाजची होइल ऐशी आशा ॥ तेणें जाउनी कुदशा सारी येवो आह्मां सुदशा ॥ हेची आस मनीं ॥ पुरवो तो शूलपाणी ॥ १२ ॥

### ओवी.

हिंदूमाजी ऐक्यता पूर्ण ॥ होवो तेणें देश सुधारण॥ विपत्ती विलया धाडूनि जाण॥देश हीत करा हो।१३

---

## मत्सर.

### आर्या.

षड्शत्रूं पैकीं झाले पीडित मत्सराहिं जन बहुत ॥ प्रत्यहि-दृष्टीं पडतो दुस्तर याचा प्रभाव जगतांत ।१। राहुनि मानव हृदयीं झटतो करण्यास तो अकल्याण

शिरुनी प्रीतिस्थानीं करितो यत्नास घ्यावया प्राण २

सााकी.

माया जालीं मनुजां पाडुनी स्नेहविग्रहा करितो ॥
मायबापकीं बंधुमधीं हा अप्रीती उपजवितो ॥
ऐशी याचि कृती ॥ नुमजे आह्मां हो ती ॥ ३ ॥

शालिनी.

देशोधडीं लावियलें अनेकां ॥ यानें नृपां थोर कु
लीन लोकां ॥ वाटे भिती काय अहो करील ॥
भासे अह्मां दुष्ट कृतांत काळ ॥ ४ ॥

चामरवृत्त.

द्रव्य सुगुणि सुंदरी हि होत मुख्य कारणा ॥ म
त्सरास एकतसों तोंवि सुजनिं मारणा ॥ धैर्य, श
क्ति, जलाधि पूर्ण अजित त्याहि रावणा ॥ होत
सिता लोभ हाचि सुयश प्राण हारणा ॥ ५ ॥
बहुत भूप मरुनि जाति राज्यलोभिं भूलतां ॥ सक
ल जनांहि जाणताति ऐतिहास ती कथा ॥ मानवा
सि भस्म करी सजिवपणिंच दुष्ट हा ॥ हिंदुराज्य
जावयासि मुख्य शत्रु हाच हा ॥ ६ ॥

दिंडी.

बंधु बंधू वैरत्व आणवाया ॥ पिता पुत्रांचें प्रेम लोप
वाया ॥ सेव्यसेवक भावकीं हराया ॥ होय म
त्सर हो मुख्य कारणा या ॥ ७ ॥

चामर.

परकियांचि रीत घेति एक दील व्हावया ॥ त
रिच पूर्ण फलदतेस पावतील सर्वया ॥ पावलेहि

नीच स्थितिस राष्ट्र सुजन आमुचे ॥ खचित होय
भाग्य उदय वैभवांहि पूरुचें ॥ ८ ॥

पद.

( रुचते कां तीर्थ यात्रा, या चालीवर. )

सुधारकां प्रीय वाटे गुण दोषां काढण्या ॥
अवलोन्नती पाठि घेती पूर्णत्वें शिक्षिण्या ॥
परि नाहीं विचारासी स्थळ देती मानसीं ॥
मत्सर हा जनीं आहे तों वरि ना फलदसी ॥ ९ ॥
ह्मणुनीहो समाजाचे ऐकत्वा मेळवा ॥
मत्सर हा समूळीं कीं नाशातें घालवा ॥
सुधारणा रूपिं माळा मग हातीं वागवा ॥
मिळवूनी यशालागीं तइं कीर्ति वाढवा ॥ १० ॥

साकी.

आजवरी या शत्रु मत्सरें देशनाश बहु केला ॥
नागवील कीं पुढतीं ऐसा वाटे धाक जनांला ॥
निर्भय त्यांसि करा ॥ देशा-भीमान धरा ॥ ११ ॥

दिंडी.

भूमि देवीच्या करिति मत्सरासी ॥
ताडितातो गोवृंद, द्विज, तयांसी ॥
मिळुनि अवघे एकत्र करा मारा ॥
नूरवा त्यां मुळीं जगिं न कुठें थारा ॥ १२ ॥

साकी.

सुधारकांनीं सुधारणेचें दृढतर मूळ कराया ॥ प्रथ
मारंभीं षड्शत्रुंचा नाश समाजीं व्हाया ॥ झटणें
योग्य बरें ॥ त्याविण नोहे कांहिं बरें ॥ १३ ॥

सूर्योदय होतांची जैसा नाश तमाचा होई ॥ विप
त्तिंत महा तैसा अमुचा जाइल वा नाहीं ॥ इच्छा
होय पुरी ॥ सर्वेश्वर साह्य जरी ॥ १४ ॥

कामदा.

षड्शत्रु हे लोपती जरी ॥ भाग्य उदय हो जाहला
तरी ॥ मानुं सकल तें दैन्य लोपलें ॥ सर्वो
द्योगकीं फळचि लाधलें ॥ १५ ॥

---

## द्रव्यलोभ.

कामदा.

द्रव्य लोभ हा ज्या मनीं वसे ॥ शांतिवा दया स्प
र्श त्या नसे ॥ मायबापकीं आप्त मित्र ते ॥ वळ
खिना कधीं देश हीत तें ॥ १ ॥

साकी.

धर्मा-धर्मे मनास अपुल्या कधिंनच स्पर्शविती ते ॥
भीति न धरिती नागविण्या जन भरण्या धन थैली
तें ॥ देवची द्रव्य तया ॥ मानिती धन्य जगीं या॥२

दिंडी.

कितीकांचे कापिती कंठनाळ ॥ कितीकांतें पाजि
ती वीष धूळ ॥ इतुक्याहीं तृप्ती न त्यांचि होई ॥
चौर्य कर्मासहि प्रवर्तती कांहीं ॥३॥ मित्र वत्सलता
मनीं नाणिताती ॥ कपट द्यूताचे दास बनुनि जा

ग्रं. ३१०५
१३२



ती ॥ धर्म टाकुनि अन्यायशामि होती ॥ द्रव्य सं
चय कर्तव्य समजताती ॥ ४ ॥

अंजनीगीत.

कारागृहीं ते अंतीं पडती ॥ मेळविलें त्या कनका
मुकती ॥ अब्रू स्वकुला कलंक अणिती ॥ मान नसे
कोठें ॥ ५ ॥ सुमित्र बोधा नच सेवीती ॥ सदां
कुशब्दें अपमानीती ॥ अहंकारमदीं धुंदचि होती ॥
स्वर्ग गमे हातीं ॥ ६ ॥

उपजाती.

उद्योग त्यांचा धन हारण्याचा ॥ दांभीक वृत्ती जप
आवलांचा ॥ एकांत वासा करुनी सदां ते ॥ श्रीमा
न नाशा धरिती मनीं ते ॥ ७ ॥

साकी.

रजनी वाटे परम सुखाची आत्म प्राप्तिची खाणी ॥
द्रव्य लोभ मदीं धुंद होउनी सेविती कू विषया घाणी॥
कैसे खरयेती ॥ जन्मा ह्या भूवरती ॥ ८ ॥

मालिनी.

मधुर मधुर वाणी बोलुनी सज्जनांशीं ॥
सुखकर गमवीती मैत्रिहो आबलांशीं ॥
भुलवुनि कपटानें घात त्यांचा करीती ॥
गृहित सफळ झालें मानिती धन्यचित्तीं ॥ ९ ॥

दिंडी.

काय वाटे परमार्थ लाभ त्यांतें ॥ ह्मणुनि हरिती पर
वित्त अधर्मांतें ॥ देश अहिती खरप्रवर्तती कैसे ॥
अंतिं होती नरकास पात्र पीसे ॥ १० ॥

### पृथ्वी.

स्वदेश अदिती तया वदुनि दोष देती पहा ॥
जनीं न मिळतो कधीं सुखद मान मूढा महा ॥
दया न वसते मनीं सतत द्रव्य लोभा धरी ॥
परी न लभतें करी वदन कृष्ण लोकांतरी ॥ ११ ॥

### दिंडी.

कनक कांता ह्या दोन वस्तु माना ॥ तुच्छ जगतीं ज
रि मेळविणें माना ॥ सदां राहूनी नीरिच्छ सुलभ
व्हाया ॥ जन्म, नर ना सार्थक्य दवडि वाया ॥ १२ ॥

### शार्दूल विक्रीडित.

ठेवी आस जरा धनीं, नच वरा दुर्लभ हा वा नरा ॥
अन्यायें न करा निराश्रित नरां, सन्मार्ग तो आचरा ।
स्वर्गींचे पितरां सदां हितकरा सन्मान द्या ईश्वरा
कीर्तीतेचिवरा जिहीं शुभकरा संसार हा साजरा । १३ ।
द्रव्यातें न भजा मनांत उमजा लावा यशो सू ध्वजा ॥
वेश्यांते नुमजा कलीयुगिं सजा साधूजनां संगिं जा ॥
कांतापाशत्यजा कधीं नच धजा बद्धल काया-भुजा ॥
टाका दुष्टमजा भुलूनिनवजा दुर्मार्गीं हीं स्वैरजा ॥ १४ ॥

### शार्दूल विक्रीडित.

वाणी रानवटी तिला मनिं घटीं ठेवूनि श्रेष्टीं जटीं ॥
बोधा सू कवनापटीं गुरकटी वांधा हृदीं संपुटीं ॥
आठी अंगसटी नमुनि किरिटी, मार्तंडतो धूर्जटी ॥
तोषा द्या सकलां, तटीं कविस ही पुष्टी हि काव्यागुटीं १५

---

# मद्यपाननिषेध,

### भुजंग प्र०

सुरा पीउनी काय कल्याण होतें ॥ कशी वाटते प्रीय नीचांस हो ते ॥ धना वेंचुनी पीतरां नागवीती ॥ जनीं बोध केल्या मनीं नाणिताती ॥ १ ॥
सुरे पासुनी होति तोटे अनेक ॥ क्षुधाही शमेना तृषा कांहिं एक ॥ अनेका परी मेळवील्या धनाला ॥ दुरी फेंकिती प्राशुनीया विषाला ॥ २ ॥
प्रयासें मिळे अब्रुलोकीं जयाला ॥ प्रयत्ना करीती जिच्या रक्षणाला ॥ असे नीमिला कांचरूपीं तियेला ॥ पहा मेळवीती कशी हे धुळीला ॥ ३ ॥
गृहा सोडुनी दारत्यागीं बनूनी ॥ पुजीती सदां माय बापां शिव्यांनीं ॥ जरी पूर्णते रंक होऊनि गेले ॥ दिसेना तरी जे सुरीं धुंद झाले ॥ ४ ॥
जरी ना मिळे द्रव्य दारू पिण्यातें ॥ वरी ती पहा चौर्य कर्मास ही ते ॥ सदां वास त्यां संगवेश्या जनाचा ॥ निदानीं मिळे वास कारा गृहाचा ॥ ५ ॥

### दिंडी.

शरीराची बहु हानि जरी होई ॥ द्रव्य आब्रुही सर्व लया जाई ॥ तरी नाहीं उघडीति नेत्र नीच ॥ धुंद होती ते शुद्ध अंध साच ॥ ६ ॥
किती वर्णावें अधम सुरावृत्त ॥ बघूनीया व्यसना

सि जळो चित्त ॥ निशीदीनीं दीसती झुंडि मार्गी ॥
गटारींत लोळती जनाऽधर्मी ॥ ७ ॥
भीति वाटे होईल प्रळय काय ? ॥ धर्मश्रद्धा जाईल
बुडुनि काय? ॥ सुधारक ते करितील यत्न काय? ॥
सुरचात्या करण्यासि लोप काय ? ॥८॥
देश हानी होईल अशी भीती ॥ जरी सर्वी वागेल
मानसीं ती ॥ वृद्ध आर्यांचें साह्य मेळवीती ॥ लया
जाई तरि, मद्य चाल होती ॥ ९ ॥
जरी करिती ते सुजन प्रयत्नातें ॥ सत्य वाटे बहु
फलद होय त्यांतें ॥ धर्म रक्षण करण्या हिं पुण्य मो
ठें ॥ होय बांधवहो! मुळिं न तुह्मी तोटे ॥ १० ॥
देश बंधूनां करुनि विनंतीही ॥ सूखवा त्यां भजता
ति सुराजेही ॥ चाल मोडुनी कीर्ति मेळवावी ॥
मा. वि. टो. चीहि आस पूर्ण व्हावी ॥ ११ ॥

## चामर वृत्त.

धर्म रक्षणार्थ सतत झटुनि कीर्ति वाढवा ॥
देवि सुरा पुजिति त्यांसि शास्त्र वचनिं गुंतवा ॥
अचरुं बघति द्वैत धर्म भीति त्यांसि दाखवा ॥
निर्मुलासि करुनि दुष्ट आर्य देश शोभवा ॥ १२ ॥
अंध, पंगु, मद्य व्यथित, मूढ, अज्ञ मानवां ॥
गुणी परिहि आश्रया पडत ज्यांस वानवा ॥
त्यांसि सुजनिं यत्न करुनि साह्य सौख्य द्यावया ॥
हेंचि विरुद मनुज जन्मि जाणणें सदां दया ॥ १६ ॥

---

# वेश्यागमन निषेध.

## भुजंगप्रयात.

अहा! केविप्राणी भुलूनीरुपास ॥ कसे वश्य होतात वेश्या जनांस ॥ महा कूलटा शोधिती हो निशीस॥ मनीची करूं पाहती पूर्ण आस ॥ १ ॥
निशीं पाहतां मार्गिं साऱ्या सुकाळ ॥ जणूं मातले दीसती शुद्ध पोळ ॥ वदूं कोण मोठे किती साहुकार ॥ नसे मीति कांहीं अहो तें भिकार ॥ २ ॥
त्यजूनी गृहा धर्मपत्नीस दुष्ट ॥ जुमानिति ना माय बापां कुचिष्ट ॥ सदां घोटिती लाळ रांडा पदींहो दुज्यां बोधिती देवि वेश्या पुजा हो ॥ ३ ॥ इच्या संगतीं स्वर्ग सूधा असे हो ॥ खरें सेवुनी मेळवा मोक्षलाहो ॥ कली माजि सांठा सुखाचा इथें हो ॥ असूनी कशा वांछितो 'काशि' पाहो ॥ ४ ॥ अशा अन्य मार्गें कितीकां बुधांनां ॥ फशीं पाडिती गोवुनी पाशि त्यांनां ॥ तधीं आठवे त्यांसिहो रामनाम ॥ परी अंतिं कैसा मिळे त्यां अराम ॥ ५ ॥
जधीं सेवितां कूबजा गोड लागे ॥ जणूं पुण्य खाणी मिळाली स्वभागें ॥ अनूताप होतां विषा अंतिं ओके ॥ पिसा होउनी श्वान वाणीच भोंके ॥ ६ ॥
पहा लौकिका खर्चुनी साग्र वित्त ॥ सखा जोडिती क्रूर दारिद्र्य मत्त ॥ अनाथा परी लाविती पत्नि पोरां ॥ भिकेला पहा फीरती दारुदारां ॥ ७ ॥

जरी येइहो गोष्ट ऐशा थराला ॥ मुखा दावण्या मा र्ग नूरे जनांला ॥ सुटेना तरी छंद वारांगनांचा ॥ खरा सेविती नर्क या लोकिं साचा ॥ ८ ॥ लुटी ल्यावरी द्रव्य त्यांनां मिळेना ॥ त्यजीती तरी मारु नी शब्द बाणां ॥ वदे लाल घोव्या करी कृष्ण मू खा ॥ धना-धार नाहीं तरी जाण फूका ॥ ९ ॥ अशा मेळवूनी धुळी दुष्ट रांडा ॥ पिडीती कितीकां तरूणां सुबांडा ॥ करीती पहा निर्धना मानखंडा ॥ भिती शीर मुंडा न हो चंडदंडा ॥ १० ॥ विचारा बुडे अंतिं दोहों दिशांनीं ॥ नुरे आसरा ना मिळे अन्नपाणी ॥ बरा वाटतो मृत्यु त्याते तधीं हो ॥ अहा! व्यर्थ जीणें कसें घालवी हो ॥ ११ ॥ पहा धूतला देश सारा अमूचा ॥ कसा खुंटला यत्न सू धारकांचा ॥ कळेना कसें झोंप ती आझुनी ते ॥ स्वदेशाभिमानी दडाले कुठें ते ॥ १२ ॥ भुलूनी स्वदेशा सदां आत्म स्वार्थां ॥ करूं पाहती नेणती कर्म आर्थां ॥ असो हो तरी पूर्ण धिःकार त्यांनां ॥ नको संग त्यांचा पहाणें मुखांना ॥ १३ ॥ कधीं ईश दावील आह्मां सुदीन ॥ कधीं ताप हारील हे हीन दीन ॥ कधीं लोप होईल वेश्याजनांचा ॥ अ धूनीक ऐशाहि सूधारकांचा ॥ १४ ॥ नको सांग णें फार हो देश बंधू ॥ त्यजा कूबजा छाकव्या दुष्ट भोंदू ॥ समाजीं तुह्मीं ठेउनी ऐक्य भावा ॥ सदां 'मा. वि. टा.' बोध चित्तांत ठेवा ॥ १५ ॥

# पतिव्रताधर्म.

## साकी.

प्रातःकाळीं स्नान समार्जन नित्य विधी अचरावे ॥
प्रीतीनें पती पदीं नमुनी तीर्थ तयाचें घ्यावें ॥
माना भूषण त्या ॥ राखा पातिव्रत्या ॥ १ ॥

## शार्दूलविक्रीडित.

यात्रा, तीर्थ,व्रतें उपासक विधी नेमा नको सर्वथा॥
आज्ञा मोडुनि ही कधीं परगृहीं जाऊं नका सर्वथा ॥
आहे खिन्न मनीं पती तरि तुम्हीं तैसें असावें नव्हे ॥दा
वूनी स्मितहास्य त्या सुवदना मोदा प्रिया गौरवें ॥२॥
ल्यावें कुंकुम भाळिं तेंवि नयनीं घालूनि ही कज्जल॥कं
ठीं मंगलसूत्र भांगिं तिलका सिंदूर ल्यावादल॥ घ्यावें
तांबूल तोडरांहिं चरणीं घाला करीं कंकणें ॥ येणें
वाढत आयु प्रीय पतिचें,तुम्हीं तसें वागणें ॥ ३ ॥

## उपजाती.

व्याधिष्ट रोगी धनहीन अंध ॥ असो पती तो कि
तिहीकिंमंद ॥ कंगाल वा वृद्धाचि शक्तिहीन ॥ मा
ना तरी वंद्यचि नाथ जाण ॥ ४ ॥

## अंजनीगीत.

असेल जैशी पतिची अवडी ॥ तैशिंच ल्यावीं लेणीं
लुगडीं ॥ दुश्चित्तचि तो असतां विघडी ॥ आपण
शृंगार करूं नये ॥ ५ ॥ असेल जितुकी पतिला मा

ष्टी ॥ तितुक्या माजीं माना तृप्ती ॥ दुबळा असुनी न निंदीती ॥ पतिव्रता तीच हो ॥ ६ ॥

साकी.

वागुनि ऐसें पतिला सुखवा तसेंच आप्त गणांना ॥
सार्थक होतिल श्रम कर्त्यांचे विनतीही भगिनीनां ॥
सन्मानें अदरावा ॥ यशोध्वज मिरवावा ॥ ७ ॥
संसारीं ह्या साह्य करा हो पतिला तुम्हि हरकामीं ॥
बिकट सागरू पार तरा हा सोडुनि द्या ती मी मी ॥
हेंची मत् विनती ॥ मान्य करा हो सुमती ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

विद्वान होतील देशी भगीनी ॥ देतील साहाय्य भर्त्या झटूनी ॥ सूधारणेतें करितील मानी ॥ होवो अमूची पुरती सुवाणी ॥ ९ ॥

दिंडी.

आस आम्हां विद्वान तुम्हीं व्हावें ॥ हिंदु हीनत्वा प्रती लोपवावें ॥ परकियांच्या स्त्रीयांस मिळालें जें ॥ त्याच श्रेष्ठत्वा परत मेळवीजे ॥१०॥ सुधारक जें जें करिति तुम्हां साठीं ॥ कष्ट होतिल सूसाध्य आस मोठी ॥ गौरवा त्यां देऊनि यशालागीं ॥ कीर्ति होवो तुमची मही भागीं ॥ ११ ॥

आर्या.

कथिलें 'मार्तंडानें' सतिनों! घ्या सूविवेक घुटका हो ॥ होतील पूर्ण मनोरथ ईश कृपेनेंचि आर्य भगिनी हो ॥ १२ ॥

---

# एका भाग्यवानाचा स्त्री विरह.

## शार्दूल विक्रीडित.

वायू वाहुनि उष्ण हा निशिदिनीं तोषास देईचना ॥
देहातें न करी अराम बहुधां संतप्त गे या मना ॥
सौख्याचा घट हा वसंत असुनी लेशा मिळेना मला॥
वाटे व्यर्थ यया पसंत करिती भूलोनि ह्या कोकिला ।१।

## साकी.

प्रभातकाळीं वाटे कांहीं थंडगार जन युवतीं ॥
सुरत सुखालिंगन भोगा या खाशी वेळहि ह्मणती ॥
परि ही मजला तो ॥ तापद सखयेगे गमतो ॥ २ ॥

## दिंडी.

वियोगानें जाळिलें मानसातें ॥ शरिरिं साऱ्या हा
दुःख देइ मातें ॥ सौख्य होईना प्रीय मंदिरांत ॥
मंद वायू हीं गोहिं अरण्यांत ॥ ३ ॥ स्मरण होतें
तव नित्य अन्न खातां ॥ निजत, फिरतां, महालिं
कधीं जातां ॥ मंचकीं जरि बैसलों भ्रांत चित्ता ॥
विषम वाटे मन्मना जाळि चित्ता ॥ ४ ॥ असासि
प्रीये मज पूर्ण साह्यकारी ॥ सूखदुःखा रति सत्य
अधीकारी॥बटिक समजुनि जन वागाविती भार्या ॥
शुद्ध खाटिक ते मान्य ज्यां न आर्या ॥ ५ ॥ आज
वरि ह्या शोकां न पाहिलें गे॥विरह तूझा कधिं सांग
साहिला गे ॥ असति मत्सम जे जगीं मनुज कोणी ॥

तोचि जाणति हा पत्नि वीरहाग्नी ॥ ६ ॥ शीर माझें दूखतां कदां काळीं ॥ प्रिये शुंठी घालील कोण भाळीं ॥ कवण दाविल ती पदातलां भार्ये ॥ प्रीय वचनें रिझवील कोण आर्ये ॥ ७ ॥ कोण शांती देईल मनाला या ॥ थकुनि झाल्या कष्टांसि घालवा या ॥ क्रुद्ध राक्षसि ही रजनि सखे माते ॥ भक्षु पाहे प्रतिदिनीं प्रीय कांते ॥ ८ ॥ कसे कंठूं मी दीन वियोगाचे ॥ शांतवनगे किति करूं मानसाचें ॥ धीर देतो परी अधिर बहू होई ॥ तेज शक्ती लोपूनि क्षीण होई ॥ ९ ॥ किती वर्णूं हा विरह तुझा कांते ॥ सुचत नाहीं मज कामधाम शांते ॥ कधि न होई पूरता काळ मातें ॥ वर्णण्यासी तव गूण कवी तेतें ॥ १० ॥

## शिखरिणी.

अहा आर्ये ! भार्ये ! कमलनयने ! इंदुवदने ! ॥ सखे ! कांते ! शांते ! रमणकुशले ! केलिसुमने ! ॥ सुनेत्र ! लेखातें लिखुनि जन हा पावन करी ॥ किती देऊं तूतें कथिग उपमा रम्य कुसरी ॥ ११ ॥

## दिंडी.

असो आतां विस्तार बहू होई ॥ विवेकांहीं आकर्षि मना पाही ॥ धीर येई जरि प्रीति पत्र येई ॥ भेट होई तो सुदिन समजुं पाही ॥ १२ ॥

## हरिणीवृत्त.

कठिण समय हा येवो न असा सखे कधिं वैरियां ॥
विरह रमणी, नाहो, कोणां दुखी न करो प्रिया ॥

सतत उभयां वासा-नंदें सुसार सुखा मिळो ॥ सकल जनहीं मा. वि. टो. च्या सुबोधनया वळो ॥ १३ ॥

कामदा.

पूर्ण भो कृपा झालिया वरी ॥ सौख्य वासना होय ती पुरी ॥ सुघड चालतो सार सज्जनीं ॥ विघड करावितो नित्य दुर्जनीं ॥ १४ ॥

साकी.

संसारीं जरी मिळे सुकामा सद्गुणशाली रामा ॥
धन्य तया जीवित्व जगींया लाधुनि ऐसी भामा ॥
व्यर्थचि नाहिं तरी ॥ ह्या भूजननीला भारी ॥ १५ ॥

---

## उष्णकाळ.

मालिनी.

प्रखर बहुत उष्णें तापली भूमि सारी ॥ मनुजन फिरति ते मार्गीं ऐशा कहारीं ॥ दिनमणि बहु कोपें येतसे अग्र भागीं ॥ कुलसति भुमि माते, पोळवी जागजागीं ॥ १ ॥ गरिब गुरिब ज्यानां नामिळे अन्नपाणी ॥ उदर भरण आर्थीं फीरती आनवाणी ॥ चटचट पद पाहा पोळती धांवताती ॥ कितितरि हिनभागीं भागले दीसताती ॥ २ ॥

चामर.

घर्म बिंदु लोट निघुनि श्वास भरित होतसे ॥ शरीर वस्त्र भिजुनि सर्व घावराहि होतसे ॥ कंठशोष पडु

नि रडत, खडत, पळत बापुडा ॥ तारि देवराय वदत कठिण काळ वांकडा ॥ ३ ॥ उष्ण मास दोन प्रहर समय काळ भासतो ॥ अंधदीन सज्जनांशि पाशि जणुं कि बांधितो ॥ हाय! हाय! वदवि त्यांसि युवति वर्गि तापदा ॥ थंड वायु गंध ना मिळ बहूत आपदा ॥ ४ ॥ वेळ बहुत मोद देइ मानसा सकाळचा ॥ पुष्पबाग दर्वळे सुगंधतेवि सांजचा ॥ भूस ही तरूवरां तशी जनां प्रफुल्लता ॥ ये, पहा पक्षि करिति गान मान नृत्यता ॥ ५ ॥

साकी.

धवल चंद्र प्रकाश पडतां जनमन स्फुर्ती पावे ॥ महा सिंधुपरी, रमण्या, फिरण्या संगोत्सुक भावें ॥ घेउ नि ललनांते ॥ करिती बहु केलीते ॥ ६ ॥
वासंतीं ह्या सुखोपभोगा घेती नर श्रीमंता ॥ तरूण युवती संगीं रमुनी तृप्ती हो धीमंता ॥ इतरां दुर्लभ ती ॥ यत्नें प्राप्त न होती ॥ ७ ॥ परंतु ऐशा समई देशा दुष्काळें जरि पिडिलें ॥ दुर्दैव खरें ह्या आर्यांचें 'गो' पंजरकीं उरलें ॥ ग्रासा वांचोनी ॥ तळमळतीं निशिदीनीं ॥ ८ ॥ वर्षो घन भू देवो सकलां धन धान्य तृणांदिकही ॥ लोप करी दुर्दैव तमाचा घालो मजला भिकही ॥ देवा मानी ही ॥ 'मा. वी.टो.' विनतीही ॥ ९ ॥

# पितृसेवा.

## ओवी.

नवमास वाहुनी उदरीं ॥ कष्ट सोशिले अती भारी ॥
बाल जन्मपावल्यावरी ॥ मोद जीतें होतसे ॥ १ ॥

## पृथ्वी.

पित्या जननिनें जधीं करुनि कोड थोराविले ॥
असह्य बहु यातनीं जनि तुह्मांस संरक्षिलें ॥
अगण्य धन वेंचुनी सुविद अमृता पाजिलें ॥
गुणी बघुनि पंकजा नव वधूस पर्णाविलें ॥ २ ॥

## शिखरिणी.

अशा आई बापां, कितिक सुतते हो दुखविती ॥
मिळाल्या सन्माना किमपिहि मनीं ना उमजती ॥
स्वकीयां बंधूनां त्यजुनि सहजीं दूर पळती ॥
परी सद्वीवेका हृदयिं कधिं नाहीं शिववितीं ॥३॥

## अंजनीगीत.

कर्तव्य कर्मास भुलुनी जाती ॥ वृद्धपर्णी त्यां
दुःखची देती ॥ आशा वृक्षहीं, त्यांचा खुडि
ती ॥ अधमाधम कांहीं ॥ ४ ॥

## पंच चामर.

मायबाप करिति आस पुत्र सौख्य देउनी ॥ वार्धकीं
हि पोषणास करिल कीर्ति सूजनीं ॥ प्रीय यष्टि
आमुची हि वागवूं किं हांसत हो ॥ नाशिवंत पाश
त्यागुं लाभवूं किं स्वर्ग हो ॥ ५ ॥

### साकी.

कंटक रुततां सुतचरणीं हो वदतां अभद्रकोणी ॥
वृद्धांच्या नच खळतें जनहो! नेत्रांतिल तें पाणीं ॥
वर्णूं काय प्रिती ॥ सौख्याची खाणिच ती ॥ ६ ॥

### पंच चामर.

भाग्यवान होय सूत धन्यताहि वाटते ॥ पाहतांचि पुत्र मूख जन्म कष्ट वारिते ॥ वर्णितांचि बाळकीर्ति हर्ष हृदयिं होतसे ॥ धन्य धन्य धन्य ह्मणति धन्य सूत हा असे ॥ ७ ॥

### साकी.

हजारांतही एक मिळेना जो सेवी पितरांला ॥ शुक योगिंद्रा समर्कों जन हो एक निश्चयी जहाला ॥ पितरां सेवीती ॥ विरळा जन आजि दिसती ॥ ८ ॥

### पंचचामर.

एकि नाहिं आर्यबंधु माजिं अजिहि राहिली ॥
पुत्र भुलुनि पीतरांसि बंधुताहि लोपली ॥
आलियाहि इंग्रजीचि ट, फ, करुनि झोंकिती ॥
ब्रांडिच्याहि गुंगि माजि पुत्रधर्म भूलती ॥ ९ ॥

### भुजंगप्रयात.

कुठें मायबाप कुठें देशहीत ॥ भुले आत्म स्वार्थ तिहो पत्नि सूत ॥ त्यजी काम धंदा न सेवी मुकुंदा॥ अशा आडदांडा मिळो कर्म दंडा ॥ १०॥ जगीं लोपली पितृसेवा इशाची ॥ गुरूचीं तशी आर्यदेशी जनांची ॥ असे कोप झाला तयांचा ह्मणूनी ॥ पहा नेति कैसें स्वदेशा धुवूनी ॥ ११ ॥

### शिखरिणी.

अहा ईशा! आजी मजनच कळे देश सुगती ॥
कधीं कोण्या काळीं बुधजन सुनीती अचरिती ॥
कसा देशाभीमान सकल अजिझाला तमरुपीं ॥
कुठें गेले मी मी ह्मणवविति ज्ञाते अधुतपी ॥ ११ ॥

### स्रग्धरा.

गेली सारी लयाला सुफलद सकलां मान्य जी पितृसेवा ॥ झाले सूधारकांदी प्रतिकुल करण्या आत्म देशीय कावा ॥ ठेवीला बोध गुंडाळुनि अजि जगतीं ज्ञान शून्या जनांनीं ॥ गेले भागूनि सारे सुकविहि अजिचे बोधितां 'मा. वि. टो' नी ।१३

### साकी.

पितृसेवा उदय पावुनी होई आर्यैवयला ॥ राहिल अपुली स्थिर भूजननी सुगुणी जन वक्तृत्वा॥ कांहीं काळवरी ॥ बुधहो सत्याचि मम वैखरी ॥ १४ ॥

---

## ईश्वरापाशीं मागणें.

---

### कामदा.

भक्तवत्सला हे दयाघना ॥ कमल लोचना पुरवि वासना ॥ दासमी तुझा जोडितों करा ॥ पाव सत्वरी श्रीमहेश्वरा ॥ २ ॥

### इंद्रवज्रा.

आतां प्रभो दीन दयाळ देवा ॥ मन्मानसातें स्वप दासि ठेवा ॥ राहो तुझें नाम मुखांत गोड ॥ संपूर्ण माझें पुरवोनि कोड ॥ ३ ॥

## दिंड्या.

संत सदनीं आनंद पूर वाहे ॥ दुःख लेश न त्या
कधीं विषय मोहे ॥ साधु सज्जन कीर्तना सर्व का
ळीं ॥ करुनि उल्हासें देति प्रेमटाळी ॥ ४ ॥ काळ
जाइल झडकरि नियम नाहीं ॥ मूळ मृत्यूचे येति
दूत पाहीं ॥ चित्त वेधुनि टाकित तीच माया ॥
कारणांतें होईल नरकिं जाया ॥ ५ ॥

## साक्या.

पतित पावन नरनारायण हरीकेशव दीनदयाळा ॥
रूप तुझें मन अविरत शोधो नामजपो जनपाळा ॥६॥
उदर हिंडवी देशोदेशीं दारोदारीं भिक्षा ॥ मागवि
कुंठित जहालों देई नाम जपाची दीक्षा ॥ ७ ॥

## शार्दूल वि०

ब्रम्हा विष्णु महेश इंद्र मुनिहे देवा तुला पूजिती ॥
वेदालाहि परी अगम्य महिमा भावें जरी वानिती ॥
तेजस्वीन तुझ्या समान अथवा त्रातान कोणी दुजा ॥
वंदी मी ह्मणुनी सदोदित तुझ्या स्वामी सुपादांबुजा ९

## पृथ्वी वृत्त.

अगम्य महिमा तुझा मजन वानवे ईश्वरा ॥
स्वभाव अतिभ्याड हा ह्मणुनि देशि या आसरा ॥
जरी वशन होसि तूं तुजविणें भुकेला असे ॥
पहा नयन इच्छिती तव सुदर्शनाला कसे ॥ १० ॥

## शार्दूल वि०

कोणी कृष्ण वदे दुजा ह्मणतसे हे राम देवा तुला॥
ताराया पतिता विठू कलियुगीं ‘नामा’ ह्मणे पातला।

शंभो, ईश, नृसिंह, शंकर, शिवा, श्रीपाद, भोला, यते।
नामें देति अनंत, भक्त परि भो तूं 'एक' पृथ्वीपते।११।

अभंग.

मानावा हा जन्म पातकाचें सत्र ॥ ओळखावें मर्म आत्मज्ञानी ॥ नाहीं ओळखिलें ज्यानें अपपर ॥ शेवटीं खापर त्याच्या करीं॥राजारंकआम्हा सारखेच दोघे ॥ ब्रम्हानंद ओघें राहूं आह्मी॥देवाचे जे दास त्यांना नाहीं आस ॥ संसार सायास त्यांना नसे ॥१२॥ लज्जा टाकुनिया देहाचा विटाळ॥ टाकुनियां टाळ घ्यावा हातीं ॥ नाहीं त्यासि भीति मग जाण कांहीं ॥ शांतिरूपडोहीं बुडेल तो ॥ उपकार हाची चित्तांत विचार ॥ धरावा आचार नित्यमनीं ॥ होतो तयें सुखी इह परलोकीं ॥ हेची कर्तव्यकीं मनुष्याचें ॥ १३ ॥ त्यांना न ठाउक वैराग्या विषयीं ॥ म्हणजे विषयीं विषतुल्य ॥ सत्यवाचे वदा तरा भवनदा ॥ मिळवा आनंदा थोडक्यांत ॥ कांहीं नयो परी एक असे आस ॥ लावीतो पायास देवा हात ॥ पिता मुक्ति दाता तूंचि माझी माता ॥ सर्व भगवंता तूंचि माझें ॥ १४ ॥

शार्दूलविक्रीडित.

जन्मा येउनी मानवा करुनि घे नारायणा सोबती॥
सार्थक्या तरि पावशील अपुल्या अंतीं सुखाची गती॥
चिंतेचा पिकला मळा सततची दारा सुताचा लळा ॥
लोभा टाकुनि मोकळा त्वरित हो टाकोनि देई पिळा।१

# ग्रंथ कर्त्याची ईश्वरास प्रार्थना.

पद. ( सुंदर मुख तुंदिल तनु, याचालीवर. )

त्रैमूर्ती दत्तनाथ अत्रिनंदना ॥ दुष्टरोग दुरित दोष शोक भंजना ॥ धृ० ॥ सकल विश्व व्यापक हे भुवन सुंदरा ॥ प्रिय करिशी दास जनीं हृदय मंदिरा ॥ भक्तीवश कीर्ति अशी तव गुणाकरा ॥ ईशा, बहुशा, मनिशा, पूर्णकरी; दुरित हरी; सुजनिं वरी; कमल लोचना ॥ त्रैमूर्ती० ॥ १ ॥ भक्तकाज पूर्ण आज सारिलें घना ॥ पंडित जनिं मान्य असो हीच प्रार्थना ॥ एकमनें धरुनि भाव करित वंदना ॥ सदया, या, या, समया, सतत दास; पुरवि आस; दे प[illegible]स; दुष्ट कंदना ॥ त्रैमूर्ती० ॥ २ ॥ कुधारक समु[illegible] नाश हो दया करा ॥ त्रस्त दीन आर्यभार तारि पामरां ॥ विसरुं नका प्रीय दास 'मा. वि. टो.' जरा ॥ ध्यावा, वरवा, वरवा, सुखशयना; गजगमना; कलिदमना; क्षिराब्धिजानना ॥ त्रैमूर्ती० ॥ ३ ॥

---

सूचना— या 'काव्यमाले'च्या पहिल्या भागास लोकाश्रय चांगला मिळाल्यास दुसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध करूं.

समाप्त.

दुस्थानांत नावाजलेलें

] लोकमित्र [पुस्तक.

हें संन १८९१ च्या जुलै म-
पासून खानापूर येथें सुंदर
छापावर दरमहा नियत आहे
भीं याचीं पृष्ठें १२ असत. पण
च्या वर्षा पासून रंगीत कव्हरा
ह ३२ केलीं आहेत. इतकें करून
सत पूर्वीची ६४ आणेच कायम
यांत येणारे गद्यपद्य विषय
मजेदार व उपयुक्त असतात तें
र्थ सांगून उपयोगी नाहीं. आज
१ वर्षांत २ हजारांवर प्रत खपते!
श्रीमंत होळकर सरकार सुद्धा यास
ग्राहक आहेत. ज्याना साधारण मराठी
वाचनाची रुची असेल त्यांनीं याचा
अगत्य लाभ घ्यावा. ही खटाटोप
गरीब लोकां करितां आहे हें सुज्ञास
सांगणें नकोच.

पत्ता—द. गो बुकसेलर
खानापूर जि० बेळगांव.